SELECTED Superbrand INDIA 2009-10 CONSUMER VALIDATED

Finolex Cables Limited
AN IS/ISO 9001 CERTIFIED COMPANY

**FCL:SEC:SE: 24:37** 14th May, 2024

| | | |
|---|---|---|
| Corporate Relations Department<br>BSE Limited<br>1st Floor, New Trading Ring<br>Rotunda Building, P J Towers<br>Dalal Street, Fort<br>Mumbai – 400 001 | The Manager<br>Listing Department<br>National Stock Exchange of India Ltd<br>`Exchange Plaza', C-1, Block G,<br>Bandra – Kurla Complex,<br>Bandra (E), Mumbai – 400 051 | Mr Tom Schmit<br>Luxembourg Stock Exchange<br>PO Box 165<br>L-2011 Luxembourg<br>Grand-Duchy of Luxembourg<br>EUROPE |
| Scrip Code: 500144 | Scrip Code: FINCABLES | |

**Sub: Newspaper Advertisement – Postal Ballot Notice**

**Ref: Regulation 47 (1) (d) of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015**

**Dear Sir/Madam,**

In terms of the above referred Regulation, please find attached copy of Newspaper Advertisement with respect to the dispatch of the Notice of Postal Ballot to the shareholders of the Company, along with the details of record date and e-voting information published on 14th May, 2024 in all editions of "Financial Express" (English newspaper) and "Loksatta" Pune edition (Marathi newspaper).

Kindly take the aforesaid on your records.

Thanking you,

**For FINOLEX CABLES LIMITED**

GAYATRI BHAGYESH KULKARNI

Digitally signed by GAYATRI BHAGYESH KULKARNI
Date: 2024.05.14 10:17:53 +05'30'

**Gayatri Kulkarni**
**Assistant Company Secretary**
**& Compliance Officer**

Encl.: As above

**Finolex**
**CABLES LIMITED**

**Reg. Off:** 26/27, Mumbai Pune Road, Pimpri, Pune 411018
**CIN:** L31300MH1967PLC016531 | **Email:** investors@finolex.com

## NOTICE OF POSTAL BALLOT

**NOTICE** is hereby given pursuant to Sections 110 and 108 of the Companies Act, 2013 (the **"Act"**) and other applicable provisions, if any, of the Act read with Rule 20 and Rule 22 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 (the "**Rules** "), each as amended from time to time, read with General Circular No. 14/2020 dated April 8, 2020, General Circular No, 17/2020 dated April 13, 2020, General Circular No. 20/2020 dated May 5, 2020, General Circular No. 22/2020 dated June 15, 2020, General Circular No. 33/2020 dated September 28, 2020, General Circular No. 39/2020 dated December 31, 2020, General Circular No. 10/2021 dated June 23, 2021, General Circular No. 20/2021 dated December 8, 2021, General Circular No. 3/2022 dated May 5, 2022, General Circular No. 11 /2022 dated December 28, 2022 and General Circular No. 09/2023 dated September 25, 2023, issued by the Ministry of Corporate Affairs (the **"MCA"**) (hereinafter collectively referred to as the **"MCA Circulars"**) and the Securities and Exchange Board of India's Circular dated May 13, 2022, Circular No. SEBI/HO/CFD/PoD-2/P/CIR/2023/4 dated January 5, 2023 and Circular No. SEBI/HO/CFD/CFD-PoD-2/P/CIR/2023/167 dated October 7, 2023, and Regulation 44 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 (including any statutory modifications) or re-enactment(s) thereof for the time being in force, for the proposed Resolution of appointment of Mr. Shane Pedder (DIN - 03595409) as a Non-Executive-Non-Independent Director for seeking approval by the Members of Finolex Cables Limited (the "Company") by means of Postal Ballot, only by voting through electronic means (remote e-voting).

In accordance with the Act and MCA Circulars, the Company has completed the dispatch of Postal Ballot notice on 13th May, 2024, in electronic form only to those Members who have registered their email address with the Company / Registrar & Share Transfer Agent ('RTA') (KFIN Technologies Limited), / Depository Participants (DP) and whose names appear in the register of members/register of beneficial owners as received from the depositories as on 10th May, 2024 ("cut-off date"). The said Notice is also available on the website of the Company at www.finolex.com and the websites of the Stock Exchanges. i.e., BSE Limited at www.bseindia.com and National Stock Exchange of India Limited at www.nseindia.com and on the National Securities Depository Limited's (NSDL) website at www.evoting.nsdl.com.

In accordance with the MCA Circulars, the Members can vote only through remote e-voting process. A person whose name appears in the Register of Members/List of Beneficial Owners as on the cut-off date i.e. 10th May 2024 shall be entitled to vote through *remote* e-voting process on the resolution as set out in the said Notice of Postal Ballot. Any person who is not a Member as on the cut-off date should treat this Notice for information purpose only.

The manner of remote e voting by members holding shares in demat mode, physical mode and members who have not registered their email address has been provided in Postal Ballot Notice.

The Company has engaged National Securities Depository Limited (NSDL) to provide remote e-voting facility. The procedure for remote e-voting is given in the said Notice of Postal Ballot. **The remote e-voting shall commence from Friday, 17th May, 2024 (9:00 A.M. IST) and remain open up to Saturday, 15th June, 2024 (5:00 P.M. IST).** Remote e-voting shall not be allowed beyond the said date and time and shall be forthwith disabled by National Securities Depository Limited (NSDL). Once the vote on resolution is cast by the Members, the Members shall not be allowed to change it subsequently or cast the vote again.

Members of the Company, who have not yet registered their email address and mobile number, are requested to register the same immediately with their Depository Participants in aspect of shares held in electronic form and by communicating to KFIN Technologies Limited in respect of shares held in physical form.

The Board of Directors of the Company have appointed Mr. Mandar Jog- Partner of M/s. Jog Limaye & Associates-Practising Company Secretaries having Membership No. F9552 and CP No 9798, failing which Mrs. Amruta Patil-Partner of M/s. Jog Limaye & Associates, Practising Company Secretaries having Membership No. A25028 and CP No 27101 as the Scrutinizer ("Scrutinizer") for conducting the Postal Ballot / e-voting process in a fair and transparent manner.

The result of the Postal Ballot will be declared within two working days of conclusion of remote e-voting process i.e., on or before Tuesday, 18th June, 2024. These results will be communicated to the Stock Exchanges and will be uploaded on the website of the Company at www.finolex.com.

In case of any query(s), the Members may refer to the 'Frequently Asked Questions' (FAQs) for Shareholders and the e-Voting User Manual for Shareholders available at the download section of www.evoting.nsdl.com / call on Number 022 - 4886 7000 / send a request at evoting@nsdl.com. Alternatively, you may contact Ms. Pallavi Mhatre, Senior Manager, NSDL on Number 022 - 4886 7000 or write to her at Trade World. 'A' Wing, 4th Floor, Kamala Mills Compound, Senapati Bapat Marg, Lower Parel, Mumbai – 400013.

For **FINOLEX CABLES LIMITED**
Sd/-
**Siddhesh Mandke**
Company Secretary & General Manager (Legal)
Membership No: A20101

**Dated :** 13th May, 2024
**Place :** Pune

## सात्त्विक-चिराग जोडीकडे लक्ष

**बँकॉक :** भारताची तारांकित जोडी सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांचे लय मिळवण्याचे लक्ष्य असून आज, मंगळवारपासून सुरू होणाऱ्या थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत (सुपर ५०० दर्जा) दमदार कामगिरीचा त्यांचा प्रयत्न असेल.

सात्त्विक-चिराग जोडीला पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत सुवर्णपदकासाठी प्रबळ दावेदार मानले जात आहे. या जोडीला थॉमस चषकात इंडोनेशिया आणि चीनच्या खेळाडूंच्या 'सर्व्हिस'चा सामना करताना अडचण येत होती. यावर तोडगा काढण्याची आता थायलंड स्पर्धेत त्यांना संधी मिळणार आहे. सात्त्विक-चिराग जोडी आपल्या मोहिमेची सुरुवात नूर मोहम्मद अजरिन अयूब अजरिन आणि टेन वी कियोंग या मलेशियाच्या जोडीविरुद्ध करणार आहे.

पुरुष एकेरीत एच. एस. प्रणॉय, किरण जॉर्ज आणि सतीश कुमार यांच्याकडे चाहत्यांचे असेल. लक्ष्य सेन आणि पी. व्ही. सिंधू यांनी स्पर्धेतून माघार घेतली आहे.

# नीरज, किशोर जेनाला थेट अंतिम फेरीत प्रवेश

**पीटीआय, भुवनेश्वर**



**फेडरेशन चषक ॲथलेटिक्स स्पर्धा**

**ऑलिम्पिक आणि** जागतिक सुवर्णपदक विजेता नीरज चोप्रा, तसेच किशोर जेना यांना फेडरेशन चषक ॲथलेटिक्स स्पर्धेतील भालाफेक प्रकाराच्या थेट अंतिम फेरीत प्रवेश देण्यात आला आहे. अंतिम फेरीसाठी ७५ मीटर अंतराचा पात्रता निकष ठेवण्यात आला असून नीरज आणि किशोर यांनी कारकीर्दीत अनेकदा हे अंतर पार केले आहे. भालाफेकीची पात्रता फेरी मंगळवारी (आज), तर अंतिम फेरी बुधवारी होईल.

नीरजने नुकत्याच झालेल्या दोहा डायमंड लीगमध्ये सहभाग नोंदवला होता. यंदाच्या हंगामातील पहिलीच स्पर्धा खेळताना नीरजने ८८.३८ मीटर अंतरावर भाला फेकत दुसरा क्रमांक मिळवला होता. विजेत्या याकुब वाडलेजच्या अंतरापासून तो केवळ दोन सेंटीमीटर दूर राहिला होता. आशियाई क्रीडा स्पर्धेतील रौप्यपदक विजेत्या किशोर जेनाचे डायमंड लीगमधील पदार्पण निराशाजनक ठरले होते. तिसऱ्या प्रयत्नानंतरच त्याचे आव्हान संपुष्टात आले. त्याला ७६.३१ मीटरचेच अंतर गाठता आले होते. आता फेडरेशन चषकात नीरजसमोर आव्हान उपस्थित करण्याचा किशोरचा प्रयत्न असेल.

गेल्या वर्षीच्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सहाव्या क्रमांकावर राहिलेल्या डीपी मनूलाही फेडरेशन चषकाच्या थेट अंतिम फेरीत प्रवेश मिळाला आहे. या स्पर्धेत ८५.५० मीटरचे अंतर पार करत पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्रता मिळवण्याचा मनूचा प्रयत्न असेल.

''ज्या भालाफेकपटूंनी कारकीर्दीत ७५ मीटरचे अंतर पार केले आहे, त्यांना फेडरेशन चषकात थेट अंतिम फेरीत प्रवेश देण्यात आला आहे. भालाफेकीसाठी नाव नोंदवलेल्यांपैकी नऊ जणांनी हे अंतर यापूर्वी पार केले असून यात नीरज आणि किशोर जेना यांचा समावेश आहे. ते थेट बुधवारी अंतिम फेरीत खेळतील,'' असे भारतीय ॲथलेटिक्सचे मुख्य प्रशिक्षक राधाकृष्णन नायर यांनी सांगितले. पात्रता फेरीतील अव्वल तीन नेमबाज अंतिम फेरीत स्थान मिळवतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# गुडघ्याच्या दुखापतीमुळे लिव्हिंगस्टोन मायदेशी

## बटलर, जॅक्स, टॉपलीही इंग्लंडला परत

**पीटीआय, नवी दिल्ली**



**पंजाब किंग्जचा** अष्टपैलू लियाम लिव्हिंगस्टोन गुडघ्याच्या दुखापतीवर उपचार घेण्यासाठी इंग्लंडला परतला असून पुढील महिन्यात होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेपूर्वी पूर्णपणे तंदुरुस्त होण्याचा त्याचा प्रयत्न आहे.

पंजाब किंग्ज संघाचे १२ सामन्यांत केवळ आठ गुण असून 'प्ले-ऑफ'च्या शर्यतीतून ते बाद झाले आहेत. त्यामुळे लिव्हिंगस्टोन मायदेशी परतल्याचा त्यांना फारसा फटका बसणार नाही. जोस बटलर (राजस्थान रॉयल्स), विल जॅक्स आणि रीस टॉपली (दोघे रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु) हे इंग्लंडचे खेळाडूही मायदेशी परतले आहेत. त्यांच्या संघांचे 'आयपीएल'मधील आव्हान शाबूत असल्याने त्यांची कमी या संघांना जाणवेल. इंग्लंडचा संघ २२ मेपासून पाकिस्तानविरुद्ध ट्वेन्टी-२० मालिका खेळणार आहे. त्यामुळे हे खेळाडू आता इंग्लंड संघात दाखल होतील.

अर्थातच, लिव्हिंगस्टोन आता पंजाब संघाच्या राजस्थान रॉयल्स (१५ मे) आणि सनरायजर्स हैदराबाद (१९ मे) या संघांविरुद्धच्या 'आयपीएल' सामन्यांसाठी उपलब्ध नसेल. लिव्हिंगस्टोनची दुखापत गंभीर नसली, तरी पाकिस्तानविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेपूर्वी त्याने आपल्या दुखापतीवर उपचार घ्यावे अशी इंग्लंडच्या व्यवस्थापनाची इच्छा आहे.

ट्वेन्टी-२० विश्वचषकासाठी इंग्लंड संघात निवड झालेले मोईन अली (चेन्नई सुपर किंग्ज), सॅम करन आणि जॉनी बेअरस्टो (दोघे पंजाब किंग्ज), फिल सॉल्ट (कोलकाता नाइट रायडर्स) हे खेळाडूही लवकरच 'आयपीएल' सोडून मायदेशी परतणार आहेत.

## लखनऊसमोर दिल्लीचे आव्हान

**लखनऊ :** लखनऊ सुपर जायंट्स संघासमोर इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटमध्ये आज, मंगळवारी दिल्ली कॅपिटल्सचे आव्हान असेल. 'प्ले-ऑफ'मध्ये पात्रता मिळवण्याच्या आशा कायम राखण्यासाठी दोन्ही संघांना विजय मिळवणे गरजेचे आहे. लखनऊ आणि दिल्ली यांच्यासह रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु संघाचे प्रत्येकी १२ गुण आहेत. मात्र, दिल्लीचा केवळ एक, तर लखनऊचे दोन सामने शिल्लक आहेत. त्यामुळे दिल्लीला पराभव पत्करावा लागल्यास त्यांचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात येईल.

● वेळ : सायं. ७.३० वा. ● थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, १ हिंदी, जिओ सिनेमा






# दमदार पुनरागमनासह कार्लसन विजेता

## प्रज्ञानंदचे चौथ्या स्थानावर समाधान; गुकेश तळाला



**वॉरसॉ :** पाच वेळच्या विश्वविजेत्या मॅग्नस कार्लसनने आपल्याला जगातील सर्वोत्तम बुद्धिबळपटू का मानले जाते, याचा दाखला देताना अखेरच्या दिवशी दमदार पुनरागमन करत सुपरबेट जलद आणि अतिजलद स्पर्धेचे जेतेपद पटकावले. भारताचा युवा ग्रँडमास्टर बुद्धिबळपटू आर. प्रज्ञानंदला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले, तर डी. गुकेश अखेरच्या स्थानावर राहिला.

अखेरच्या दिवशी नऊ फेऱ्या शिल्लक असताना कार्लसन दुसऱ्या स्थानावर होता. अग्रस्थानावर असलेल्या चीनच्या वे यीपासून तो अडीच गुणांनी मागे होता. मात्र, आपला वेगळा दर्जा पुन्हा सिद्ध करताना कार्लसनने अखेरच्या दिवशी अतिजलद प्रकारातील नऊ फेऱ्यांमध्ये आठ गुण मिळवत या स्पर्धेचे जेतेपद पटकावले. कार्लसनने सात लढती जिंकल्या, तर दोन लढती बरोबरीत सोडवल्या. त्याने वे यीविरुद्धही विजय नोंदवला. अखेरच्या दिवशी वे यीला पाच गुणच मिळवता आले. स्पर्धेअंती कार्लसनच्या खात्यावर २६, तर वे यीच्या खात्यावर २५.५ गुण होते.

पोलंडच्या यान-क्रिस्टोफ डुडाने १९.५ गुणांसह तिसरे, तर प्रज्ञानंदने १९ गुणांसह चौथे स्थान मिळवले. अखेरच्या दिवशी प्रज्ञानंदला कार्लसनकडून पराभव पत्करावा लागला. भारताच्या अर्जुन एरिगेसीला १८ गुण मिळवण्यात यश आले. त्यामुळे तो पाचव्या स्थानी राहिला. त्या पाठोपाठ नोदिरबेक अब्दुसत्तोरोव (१७.५ गुण), किरिल शेवचेन्को (१५ गुण), अनिश गिरी (१४ गुण) आणि व्हिन्सेन्ट केमेर (१३.५ गुण) यांचा क्रमांक लागला. जागतिक अजिंक्यपद लढतीसाठी आव्हानवीर ठरलेला गुकेश १२.५ गुणांसह अखेरच्या दहाव्या स्थानी राहिला.

## गुजरात टायटन्सच्या आशांवर पाणी

**अहमदाबाद :** गुजरात टायटन्स आणि कोलकाता नाइट रायडर्स यांच्यातील 'आयपीएल' सामना सोमवारी सततच्या पावसामुळे रद्द करावा लागला. त्यामुळे दोन्ही संघांना एकेक गुणावर समाधान मानावे लागले. हा सामना रद्द झाल्याने गतउपविजेत्या गुजरात संघाच्या 'प्ले-ऑफ' गाठण्याच्या आशांवर पाणी फेरले गेले.

गुजरातच्या संघाला या सामन्यात विजय अनिवार्य होता. परंतु संततधारेमुळे एकही चेंडू न टाकता हा सामना रद्द करण्याचा निर्णय पंचांना घ्यावा लागला. यानंतर गुजरातचा संघ १३ सामन्यांत ११ गुणांसह आठव्या स्थानावर राहिला. सध्या चौथ्या स्थानावर असलेल्या सनरायजर्स हैदराबादचे १४ गुण आहेत. त्यामुळे गुजरातने आपला अखेरचा सामना जिंकला तरी त्यांचे १३ गुणच होऊ शकतील आणि त्यांना अव्वल चार संघांत स्थान मिळवणे शक्य होणार नाही.

कोलकाता संघाचे आता १३ सामन्यांत १९ गुण झाले असून साखळी फेरीअंती ते अव्वल दोन संघांत राहणार हे निश्चित झाले आहे. त्यामुळे अंतिम फेरी गाठण्यासाठी त्यांना दोन वेळा संधी मिळेल.

# चाबहार बंदराच्या संचालनासाठी भारताचा इराणशी करार

**पीटीआय, नवी दिल्ली/ तेहरान**

## मध्य-आशियात व्यापारात वाढीला पूरक



**व्यापार तसेच** सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या इराणमधील चाबहार बंदराचे संचालन करण्यासाठी १० वर्षांच्या करारावर भारताने सोमवारी स्वाक्षरी केली, यामुळे मध्य आशियाशी व्यापार वाढविण्यास देशाला मदत होईल. या माध्यमातून भारताकडून प्रथमच विदेशी बंदराचे व्यवस्थापन हाती घेतले जाणार आहे.

पाकिस्तानच्या हद्दीत न शिरता आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक कॉरिडॉर नावाच्या क्षेत्रातून रस्ते आणि रेल्वे मार्गाचा वापर करून भारतीय मालाला अफगाणिस्तान आणि मध्य आशियापर्यंत पोहोचण्यासाठी हे बंदर प्रवेशद्वार ठरेल. इंडियन पोर्ट्स ग्लोबल लिमिटेड (आयपीजीएल) आणि इराणच्या पोर्ट अँड मेरिटाइम ऑर्गनायझेशन यांनी या दीर्घकालीन करारावर स्वाक्षरी केली, असे सरकारने अधिकृत निवेदनात म्हटले आहे.

बंदराचे विकसन आणि संचालनासाठी आयपीजीएल सुमारे १२ कोटी अमेरिकी डॉलर गुंतवणूक करेल, तर आणखी २५ कोटी डॉलरचा निधी कर्जरूपात उभारला जाईल. भारताचे बंदरे व जलमार्गमंत्री सर्वानंद सोनोवाल आणि इराणचे वाहतूक आणि शहरी विकासमंत्री मेहरदाद बजरपाश यांच्या उपस्थितीत तेहरानमध्ये झालेल्या समारंभात या करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

सर्वप्रथम २०१६ च्या सुरुवातीला चाबहार बंदरातील शाहिद बेहेश्ती टर्मिनलचा वापर भारताकडून सुरू झाला. पण दरसाल नूतनीकरण होणाऱ्या या कराराची जागा आता दीर्घ मुदतीच्या कराराकडून घेतली जाईल. चाबहारचा वापर गेल्या वर्षी भारताने अफगाणिस्तानला गव्हाची मदत पाठवण्यासाठी केला होता.

### चाबहारशी नात्याचा इतिहास काय?

**भारत-पाकिस्तान फाळणीनंतर पहिली चार दशके भारताचे इराण आणि मध्य आशियाशी व्यापारी संबंध जवळपास ठप्प होते. त्यात सुलभतेसाठी पाकिस्तानला डावलणाऱ्या ओमानच्या आखातावरील चाबहार बंदर अत्यंत महत्त्वाचे होते. म्हणूनच ते विकसित करण्याचा प्रस्ताव भारतानेच २००३ सालात मांडला. इराणचे राष्ट्राध्यक्ष मुहम्मद खातमी यांच्या त्यावेळच्या भारत भेटीदरम्यान यासंबंधाने चर्चा झाली. तथापि इराणच्या संशयित आण्विक कार्यक्रमावर अमेरिकेने घातलेल्या निर्बंधांमुळे या बंदराचा विकास मंदावला. पुढे २०१३ मध्ये, भारताने यासाठी १० कोटी अमेरिकी डॉलरची गुंतवणूक करण्याची ग्वाही दिली.**

# शेवटच्या तासातील खरेदीने उलटफेर

## 'सेन्सेक्स' ११२ अंश कमाईसह बंद

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई:** आयसीआयसीआय, एचडीएफसी बँक आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या अग्रणी समभागांत झालेल्या खरेदीनंतर सोमवारी सेन्सेक्स आणि निफ्टीने नाट्यमय कलाटणी घेत, दिवसाअंती वाढ दर्शवत विश्राम घेतला. मागील सलग १३ सत्रांमध्ये विदेशी संस्थागत गुंतवणूकदार बाजारात विक्रेते राहिले आहेत.

सत्राच्या शेवटच्या तासाभरात खरेदीला जोर चढल्याने, जवळपास ८०० अंश गडगडलेला मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स १११.६६ अंशांच्या (०.१५ टक्के) वाढीसह ७२,७७६.१३ वर बंद झाला. गेल्या काही सत्रांतील पडझडीप्रमाणे सोमवारच्या सत्राची सुरुवात सेन्सेक्सने ५५० हून अधिक अंशांची घसरण दर्शवत केली आणि दिवसाच्या व्यवहारात आणखी ७९८.४५ अंश घसरून ७१,८६६.०१ च्या नीचांकी पातळीवर गडगडला होता. दुसरीकडे राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी निर्देशांक ४८.८५ अंशांनी (०.२२ टक्के) घसरून २२,१०४.०५ वर विसावला. या निर्देशांकानेही २१,८२१.०५ च्या नीचांकी पातळीपासून सुमारे ३१० अंशांची वाढ केली. २२,१३१.६५ हा त्याचा दिवसांतील उच्चांक होता.

दिवसाच्या नीचांकी पातळीवरून बाजार कलाटणी घेत उसळला आणि किरकोळ का असेना पण निर्देशांकांनी सरकारात्मक बंद नोंदवला. असे असले तरी, एकेका टप्प्यागणिक पुढे सरकत असलेल्या सार्वत्रिक निवडणुकांतील घसरत असलेला मतटक्का आणि बाजाराच्या उच्च मूल्यांकनामुळे गुंतवणूकदार चिंतेत आहेत.

बाजाराला गती देणाऱ्या कोणत्या प्रमुख सकारात्मक कलाची अनुपस्थिती आणि देशांतर्गत बाजारातून विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांच्या माघारीमुळे अल्पकालीन कल कमजोरच राहील, असे जिओजित फायनान्शिअल सर्व्हिसेसचे संशोधन प्रमुख विनोद नायर यांनी मत व्यक्त केले.

# किरकोळ महागाई दरात नाममात्र घसरण

## खाद्यान्नांच्या किमती अजूनही चढ्याच



**पीटीआय, नवी दिल्ली**

**स्वयंपाकघरातील चीज**-वस्तूंसह, अन्नधान्य, पेयांच्या वाढलेल्या किमतींचा सर्वसामान्यांच्या खिशाला जाच कायम असल्याचे, सरलेल्या एप्रिलमध्ये जवळपास त्याच पातळीवर राहिलेल्या ४.८३ टक्क्यांच्या किरकोळ महागाई दराने दाखवून दिले.

सोमवारी जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीनुसार. एप्रिलमध्ये ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारीत किरकोळ महागाई दर नाममात्र घसरून ४.८३ टक्क्यांवर नोंदवण्यात आला. मार्चमध्ये हा दर किंचित जास्त म्हणजे ४.८३ टक्के होता. तर एप्रिल २०२३ मध्ये दर ४.७० टक्के होता.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, खाद्य श्रेणीतील महागाई एप्रिलमध्ये ८.७० टक्क्यांवर होती आणि मार्चमधील ८.५२ टक्क्यांवरून त्यात वाढ झाली आहे. त्यामुळे एप्रिलमध्ये जरी किरकोळ महागाई दर ११ महिन्यांच्या नीचांकी पातळीवर ओसरला असला तरी, अन्नधान्यांच्या महागाईसंबंधी अनिश्चितता आणि सर्वसामान्यांना त्याच्या झळा मात्र कायम आहेत. शिवाय हा दर सलग ५५ व्या महिन्यांत, रिझर्व्ह बँकेने निर्धारीत केलेल्या चार टक्क्यांच्या लक्ष्यापेक्षा जास्त राहिला आहे.


### सूचना
### किर्लोस्कर ब्रदर्स लि.

**नोंदणीकृत कार्यालय : यमुना सर्व्हे क्र. ९८(३-७) प्लॉट नं. ३, बाणेर पुणे, महाराष्ट्र - ४११०४५**

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीच्या निम्नोल्लेखित दस्तऐवजांचे प्रमाणपत्र हरविले आहे/ गहाळ झाले आहे आणि उक्त दस्तऐवजांच्या धारकाने/ अर्जदाराने, दुसरे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी कंपनीकडे अर्ज केला आहे.

उक्त दस्तऐवजांच्या बाबतीत ज्यांचा काही दावा आहे अशा कोणत्याही व्यक्तीने आजच्या तारखेपासून १५ दिवसांत असा दावा कंपनीकडे तिच्या नोंदणीकृत कार्यालयात सादर करावा अन्यथा कंपनी पुढील सूचनेविना दुसरे प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही करेल.

| धारकाचे नाव/ धारकांची नावे/ आणि असल्यास सह धारकांची नावे | दस्तऐवजांचा प्रकार व दर्शनी मूल्य | दस्तऐवजाचा क्रमांक | फोलिओ नं. | प्रमाणपत्र क्र. | विभिन्न क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| गजानन महादेव गाडगीळ | समभाग रु. २/- | १४९६ | जी००१०७७ | १६९६ | ११८२३२७ - ११८३८२२ |

[स्थळ] : पुणे
[दिनांक] : १३.०५.२०२४

[अर्जदारांची नावे]
विजया रमेश साठे आणि
अंजली अनिरुद्ध गोखले



### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसिने कळविण्यात येते कि खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विदयमान मालक श्रीमती जस्मिन एन. ठक्कर व श्री. राहुल ठक्कर यांनी माझ्या अशिलांन बरोबर सदर मिळकत विकत देण्याबाबत बोलणी केली आहे. सदर मिळकत वर बँक ऑफ बरोडा चा कर्जा आहे, त्याव्यतिरिक्त सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असून या मिळकतीचे पणन योग्य हक्क त्यांना प्राप्त आहेत अशी हमी व ग्वाही त्यांनी दिली आहे, तरी सदर मिळकतीवर अन्य कोणाचेही गहाण, दान, दस्त, ताबा, बँक बोजा, लेखी वा तोंडी करार, अटेचमेंट, लीज, लीन, विसारपावती, साठेखत, खरेदीखत, दावा अगर अन्य कसलेही हित संबध असल्यास त्यांनी हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत मूळकागदपत्रा निशी माझी खात्री पटवून द्यावी, मात्र या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदरील मिळकत हि निर्वेध व निजोखमी आहे किंवा संबंधितांनी त्यांचा सदर मिळकतीवर असलेला हक्क,हितसंबंध व अधिकार जाणीव पूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरून माझे अशील त्यांचा बरोबर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**परिशिष्ट :** तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली, जिल्हा पुणे, मे. दुय्यम निबंधक हवेली, पुणे यांचे अधिकार क्षेत्रातील तसेच पुणे महानगर पालिका हद्दीतील (पूर्वी नगररचना विभाग, पुणे) गाव **मौजे उंड्री** येथील स. नं. ९, हिस्सा नं २/१/ब यासी क्षेत्र ४८,५६१.८७ चौ. मी. या जमिनीवर वर बांधण्यात आलेल्या प्रोजेक्ट मधील **पॅलेस ऑर्चेड सहकारी गृहरचना संस्था मर्यादित** या मधील रो हाउस नं. ६, नाव प्रिन्स, क्षेत्र ११९० चौ. मी. म्हणजेच ११०.६ चौ. फुट, यासी चतु:सिमा खालील प्रमाणे. **पूर्वेस:** रो हाउस नं. ४ प्रिन्स, **पश्चिमेस :** रो हाउस नं. ८ प्रिन्स, **दक्षिणेस:** रोड, **उत्तरेस:** बास्केटबॉल कोर्ट/ सोसायटी गार्डन

पुणे, दि : १३/०५/२०२४.

**जयेश ह जैन, वकील,**
३०१, तिसरा मजला, अथर्व जयतु, सी.स.नं. ३८३/८, टिंबर मर्चंट कॉलोनी, घोरपडी पेठ, पुणे- ४११०४२, फोन (०२०) - २६४४९४९९.



**नमुना क्र. युआरसी-२**
**चाप्टर २१ भाग १ च्या अनुसार नोंदणी करण्याबाबत सूचना देण्याकरिता जाहिरात. (कंपनी कायदा कलम ३७४ (ब) आणि कंपनीज (ऑथोराइज टू रजिस्टर) नियम २०१४ क्र. ४(१) अन्वये.**

१) कंपनी कायदा २०१३ कलम ३६६ कलम (२) अन्वये अशी सूचना देण्यात येत आहे की वरील जाहिरात प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसात व ३० दिवसाच्या कालावधी पूर्ण होण्याआधी पुणे येथील रजिस्ट्रारकडे **अन्सार टूर्स अँड ट्रॅव्हल्स** या भागीदारी संस्थेची खाजगी मर्यादित कंपनी (समभाग मर्यादित कंपनी) म्हणून नोंदणी करण्याकरिता कंपनी कायदा २०१३ चाप्टर २१ भागाच्या नुसार अर्ज करण्यात येत आहे.

२) सदर कंपनीची मुख्य उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत :
**भागीदारी हज, उमराह, झियारत टूर्स अँड ट्रॅव्हल्स म्हणून व्यवसाय करेल.**

३) सदर प्रास्ताविक कंपनीच्या मेमोरेंडम व आर्टिकल्स ऑफ असोसिएशनची प्रत खालील पत्त्यावर पडताळणीसाठी उपलब्ध आहे.
**पत्ताः शॉप नं. ५/७, मॉडर्न प्राईड, नियर पेन्शनवाला मस्जिद, ४१० नाना पेठ, पुणे-४११००२ महाराष्ट्र इंडिया.**

४. अशी सूचना देण्यात येत आहे की वरील अर्जावर लेखी हरकत नोंदवायची असल्यास २१ दिवसाच्या आत रजिस्ट्रार, केंद्रीय नोंदणी केंद्र, भारतीय कॉर्पोरेट अफेअर्स संस्था, प्लॉट क्र. ६, ७, ८ सेक्टर ५, आयएमटि मानेसार, जिल्हा गुरगाव (हरियाणा) पिन कोड १२२०५० येथे दाखल करावा, तसेच कंपनीच्या नोंदणीकृत पत्त्यावर त्याची प्रत पाठवावी.

दिनांकः १०/०५/२०२४

**अर्जदार**
**१. शेख मोहमद अय्युब दस्तगीर**
**२. शेख सुलताना मोहमद अय्युब**
**३. शेख हिजकील मोहमद अय्युब**

वरील नोटीस मध्ये काही अडचण अथवा शंका असल्यास इंग्रजी प्रत ग्राह्य मानण्यात यावी.



**Finolex CABLES LIMITED**
**रजिस्टर ऑफिस:** २६/२७ मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११०१८
**CIN:** L31300MH1967PLC016531 | **Email:** investors@finolex.com

### पोस्टल बॅलटची माहिती देणारी सूचना

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की कंपनी अधिनियम,२०१३(कायदा) चे कलम ११०,१०८ आणि इतर लागू तरतुदींसोबत वाचले जाणारे कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ चे नियम २० आणि २२ (ह्यामध्ये त्यामधील वेळेवेळी दुरूस्ती केलेले सांविधिक बदल किंवा पुनरधिनियमन सुध्दा समाविष्ट) मधील तरतुदी सर्वसाधारण परिपत्रक क्रं १४/२०० दिनांकीत एप्रिल ८ २०२०,१७/२०२० दिनांकीत एप्रिल १३ २०२०,२०/२०२०,दिनांकीत मे ५,२०२०,२२/२०२० दिनांकीत जून १५,२०२०,३३/२०२० दिनांकीत सप्टेंबर २८,२०२०, ३९/२०२० दिनांकीत डिसेंबर ३१, २०२०, १०/२०२१ दिनांकीत जुन २३, २०२१, २०/ २०२१ दिनांकीत डिसेंबर ८,२०२१, ३/२०२२ आणि दिनांकीत डिसेंबर मे ५, २०२२, ११/२०२२ दिनांकीत डिसेंबर २८,२०२२ आणि ०९/२०२३ दिनांकीत सप्टेंबर २५,२०२३ कॉर्पोरेट कामकाज मंत्रालयाने जारी केलेले (यापुढे एकत्रितपणे एमसीए परिपत्रक म्हणून संदर्भित)आणि सिक्युरिटीज अँण्ड एक्सेंचेंज बोर्ड ऑफ इंडियाचे १३ मे २०२२ चे परिपत्रक क्रमांक SEB/HO/CFD/PoD-2/P/CIR/2023/4 दिनांक ५ जानेवारी २०२३ आणि परिपत्रक क्रमांक SEB/HO/CFD/PoD-2/P/CIR/2023/167 दिनांक ७ ऑक्टोबर २०२३ अणि भारतीय सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्डाचे नियमन ४४ ( सूचीबध्द दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ (SEBI सूची विनियम)(कोणत्याही वैधानिक सुधारणांसह किंवा त्यावेळेस अंमलात असलेले पुनर्नवीकरण समाविष्ट) सूचनेमध्ये मांडलेल्या श्री शेन पेडर (डिआयएन - ०३५९५४०९) यांची नॉन एक्सएक्झीकीटीव्ह नॉन इंडिपेंडंट डायरेक्टर म्हणून नियुक्ती करण्याच्या ठरावावर फिनोलेक्स केबल्स लिमिटेड (कंपनी) च्या सदस्यांनी पोस्टल मतपत्रिकेद्वारे, फक्त इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान करण्याचा मार्गाने ( रिमोट इ-व्होटिंग) दुरस्थ इ-मतदान स्वीकृती मिळवण्याचे प्रस्तावित आहे.

कायदा आणि परिपत्रकानुसार, कंपनीने १३ मे २०२४ रोजी पोस्टल बॅलेट नोटीस केवळ इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठविण्याचे काम पूर्ण केले आहे. ज्यांनी त्यांचा इमेल पत्ता कंपनीकडे / रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंटकडे (केएफआयएन टेक्नॉलॉजीज लिमिटेड) / डिपॉझिटरीकडून १० मे २०२४ (कट -ऑफ तारीख) रोजी प्राप्त झालेल्या सदस्यांची नोंदणी / लाभार्थी मालकांच्या नोंदणी मध्ये आहेत त्यांना ही सूचना पाठविण्यात आली आहे. सदर सूचना कंपनीच्या वेबसाइटवर www.finolex.com वर स्टॉक एक्सेंचेंजच्या वेबसाइटवर बीएसइ लिमिटेड www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सेंचेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.nseindia.com , नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (NSDL) च्या www.evoting.nsdl.com च्या वेबसाइटवर देखिल उपलब्ध आहे.

एमसीएच्या परिपत्रकानुसार, सदस्य केवळ दुरस्थ इ-मतदान प्रक्रियेद्वारेच मतदान करू शकतात. ज्या व्यक्तीचे नाव सदस्यांच्या नोंदणीमध्ये / लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये कट-ऑफ तारखेला म्हणजे १० मे २०२४ ला असेल ते पोस्टल बॅलेटच्या उक्त सूचनेप्रमाणे नमूद केल्याप्रमाणे ठरावावर दुरस्थ इ-मतदान प्रक्रियेद्वारे मतदान करण्यास प्राप्त राहतील. कट ऑफ तारखेला सदस्य नसलेल्या कोणत्याही व्यक्तीसाठी ही सूचना केवळ माहितीसाठी आहे.

डिमॅट मोडमध्ये शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांनी आणि ज्या सदस्यांनी त्यांचा इमेल पत्ता नोंदविला नाही अशा सदस्यांसाठी दुरस्थ इ-मतदानाची पध्दत पोस्टल बॅलेट नोटिसमध्ये प्रदान केली आहे.

कंपनीने दुरस्थ इ-मतदान सुविधा प्रदान करण्यासाठी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (NSDL) ची नेमणूक केली आहे. दुरस्थ इ-मतदानाची प्रक्रिया पोस्टल बॅलेटच्या उक्त सूचनेमध्ये दिली आहे. **दुरस्थ इ-मतदान शुक्रवार १७ मे २०२४ सकाळी ९.०० (भा. प्र. वे.)पासून सुरू होईल आणि शनिवार, १५ जुन २०२४ संध्याकाळी ०५.०० (भा. प्र. वे.)पर्यंत खुले राहील.** दुरस्थ इ-मतदान उक्त तारीख आणि वेळेच्या पुढे परवानगी दिला जाणार नाही आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (NSDL) द्वारे ताबडतोब अक्षम केले जाईल. सभादसांनी ठरावावर एकदा मत दिल्यानंतर, सभासदांना नंतर त्यात बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

कंपनीच्या सदस्यांनी, ज्यांनी अद्याप त्यांचा इमेल पत्ता आणि मोबाईल नंबर नोंदणीकृत केलेला नाही, त्यांना विनंती आहे की त्यांनी इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असलेल्या समभागांच्या संदर्भात त्यांचा डिपॉझटरी पार्टीसिपंट कडे तत्काळ नोंदणी करावी. भौतिक स्वरुपात असलेल्या शेअर्सच्या संदर्भात केएफआयएन टेक्नॉलॉजीज लिमिटेड शी संवाद साधावा.

दुरस्थ इ-मतदान प्रक्रियेची छाननी निष्पक्ष आणि पारदर्शक पध्दतीने करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाने श्री. मंदार जोग, मे. जोग-लिमये अँड असोसिएट्स-प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी च्या भागीदार ज्यांचे सदस्यत्व क्रमांक फ ९५५२ आणि CP क्रमांक ९७९८ आहे, ते अयशस्वी झाल्यास श्रीमती अमृता पाटील, मे. जोग-लिमये अँड असोसिएट्स-प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीच्या भागीदार ज्यांचे सदस्यत्व क्रमांक ए २५०२८ आणि CP क्रमांक २७१०१ यांची छाननीकर्ता म्हणून नियुक्ती केली आहे. पोस्टल बॅलेटचा निकाल दुरस्थ इ-मतदान प्रक्रियेच्या समाप्तीच्या दोन कामकाजाच्या दिवसांत म्हणजे मंगळवार, १८ जून २०२४ रोजी किंवा त्यापुर्वी घाषित केले जाईल आणि कंपनीच्या www.finolex.com या वेबसाईटवर अपलोड केले जातील.

कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत, सदस्य भागधारकांनी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs)आणि शेअरधारकांसाठी दुरस्थ इ-मतदान वापरकर्ता पुस्तिका www.evoting.nsdl.com च्या डाऊनलोड विभागात पाहू शकतात/नंबर ०२२ ४८८६ ७००० वर कॉल करू शकतात /evoting@nsdl.com वर विनंती पाठवू शकतात. वैकल्पिकरित्या, तुम्ही श्रीमती पल्लवी म्हात्रे, वरिष्ठ व्यवस्थापक यांच्याशी क्रमांक ०२२ ४८८६ ७००० वर संपर्क साधू शकता अथवा ट्रेड वर्ल्ड ए विंग , ४ था मजला, कमला मिल्स कंपांऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई ४०००१३ येथे लिहू शकता.

**फिनोलेक्स केबल्स लिमिटेडकरीता**
सही/-
**सिद्धेश मांडके**
कंपनी सचिव आणि जनरल मॅनेजर (लीगल)
सदस्य क्र. : ए२०१०१

**ठिकाण** : पुणे
**दिनांक** : १३ मे २०२४

**विशेष सूचना** : ह्या सूचनेचा इंग्रजी मसुदा ग्राह्य धरण्यात येईल.


हे पत्र **वैदेही ठकार** यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. **दूरध्वनी**- ६७२४१०००. **फॅक्स** - ६७२४११४७. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, ऑडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, **अहमदनगर** ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. **कोल्हापूर** ०२३१- २६४४९९४.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ निवासी संपादक : सिद्धार्थ केळकर* (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd. No. RNI 56975/92 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.